

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



# विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडलवार यांनी इंद्र भावनाला दिली सदिच्छा भेट

Volume IV Issue 01 Date 07-04-2024

सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या वतीने नूतनीकरण करण्यात आलेल्या इंद्रभवन इमारतीस आज विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडलवार यांनी सदिच्छा भेट देऊन पूर्ण इमारतीची पाहणी केली. त्यानंतर स्मार्ट सिटीच्या माध्यमातून उभ करण्यात आलेल्या कमांड अँड कंट्रोल रूम या ठिकाणी विभागीय आयुक्त यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडलवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर विभागीय सह आयुक्त नगर प्रशासन पुनम मेहता यांच्या सत्कार मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आले . सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी माध्यमातून सोलापूर महानगरपालिका इंद्रभवन इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले असून त्याची संपूर्ण माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी विभागीय आयुक्त यांना दिली.

याप्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत -पाटील, मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी, नगर अभियंता सारिका अकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, विद्युत विभागाचे राजेश परदेशी, मतीन शेख संगणक विभागाचे स्नेहल चपळगावकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी विभागीय आयुक्त यांनी CCC कमांड अँड कन्ट्रोल सेंटरला भेट देऊन कामकाजची माहिती घेतली .शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करणेकामी केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी अशा इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या अमंलबजावणी करणेकरीता नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आले असून त्या मध्ये पोलिसांकडील आवश्यकत्या सुविधाचे एकत्रीकरण करणेत आले आहे. तसेच शहरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित राखणेकामी शहरातील 300 ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत. पोलीस विभागाच्या माध्यमातून या केंद्राच्या आधारे विविध प्रकारचे ट्राफिक दांडाचे चलन देण्यात येतं आहेत. आदी संदर्भात माहिती घेतली. यावेळी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.